ज्ञानगंगा घरोघरी

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**

(महाराष्ट्र शासनाने वर्ष १९८९ मध्ये स्थापिलेले)


ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक - ४२२२२२

ई-मेल : kusumagrajchair@ycmou.ac.in

**डॉ. दिलीप धोंडगे**

प्रमुख


कुसुमाग्रज अध्यासन



**कुसुमाग्रज अध्यासन**

# अहवाल

## कुसुमाग्रज जयंती



## कार्यक्रमाची रूपरेषा

**दीपप्रज्वलन व पुष्पहार अर्पण**

वेळ: स. ११:०० वा.

---

**कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत**

डॉ. दिलीप धोंडगे, प्रमुख कुसुमाग्रज अध्यासन

वेळ : स. ११:२०

---

**कुसुमाग्रजांच्या कवितांचे अभिवाचन**

डॉ. दिलीप धोंडगे सर

श्री. दत्ता पाटील

श्री. सचिन शिंदे

डॉ. सुनिल भारोडकर

डॉ. बाळासाहेब दिघे

डॉ. पूनम वाघ

वेळ : स. ११:४०

---

**अध्यक्षांचे मनोगत**

मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे सर

वेळ : दु. १२:३०

---

**आभार**

डॉ. दिलीप धोंडगे, प्रमुख कुसुमाग्रज अध्यासन

# कार्यक्रमाचे परिपत्रक

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक- ४२२ २२२

जावक क्र. : यचमम्मुवि/KAC/2025/

दिनांक : 25.02.2025

**परिपत्रक**

आपल्या विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने कविश्रेष्ठ कुसुमाग्रज तथा नाटककार, कथा-कादंबरीकार **वि. वा. शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त गुरुवार, दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी स. ११:०० वाजता** शैक्षणिक इमारतीतील सभागृहात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मा. कुलगुरु प्रा. संजीव सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली व मा. प्र-कुलगुरु डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या कार्यक्रमात कविवर्य कुसुमाग्रज यांच्या कवितांचे अभिवाचन व कविता तसेच त्यांचे साहित्य याबद्दल चिंतन मांडले जाणार आहे. विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने होणाऱ्या या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक-४२२ २२२

(दिलीप भरड)
कुलसचिव

प्रत माहितीस्तव- मा. कुलगुरू कार्यालय
मा. प्र-कुलगुरू कार्यालय

प्रत : सर्व विद्याशाखा संचालक, विभाग, केंद्र, कक्ष व विभागीय केंद्र प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्यावे.

# कुसुमाग्रज जयंती व मराठी भाषा दिन – कार्यक्रम अहवाल

**दिनांक :** २७ फेब्रुवारी २०२५
**स्थळ :** शैक्षणिक सभागृह, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
**आयोजक :** कुसुमाग्रज अध्यासन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

## प्रस्तावना

विख्यात साहित्यिक वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त व मराठी भाषा दिनाच्या औचित्याने दरवर्षी विविध सांस्कृतिक आणि साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. याच परंपरेत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनामार्फत २७ फेब्रुवारी २०२५ रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये कुसुमाग्रज यांच्या कवितांचे अभिवाचन तसेच त्यांच्या साहित्यकृतींवरील चिंतनाचा समावेश होता.

## कार्यक्रमाची रूपरेषा

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते. मंचावर कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे, कुलसचिव श्री. दिलीप भरड तसेच साहित्यप्रेमी आणि विद्यापीठाचे कर्मचारी, अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्य सादरीकरणे व विचारमंथन

सदर कार्यक्रमाची सुरुवात कुसुमाग्रजांच्या निवडक कवितांच्या अभिवाचनाने झाली. डॉ. दिलीप धोंडगे यांनी कुसुमाग्रज यांच्या साहित्यवैशिष्ट्यांवर भाष्य करताना त्यांच्या लेखनातील सामाजिक भान, मानवतावादी दृष्टिकोन आणि भाषाशैली यावर प्रकाश टाकला तसेच कुसुमाग्रजांचे साहित्य व काव्य यासंबंधी त्यांचे व्याख्यान झाले. विद्यापीठाच्या ज्ञान स्त्रोत केंद्र व भाषा अनुवाद केंद्र प्रमुख डॉ. प्रकाश बर्वे यांनी कुसुमाग्रज यांच्या सोबतच्या आठवणी सांगितल्या. या निमित्ताने प्रसिद्ध नाटककार प्रा. दत्ता पाटील, दिग्दर्शक श्री. सचिन शिंदे, श्री. बाळासाहेब दिघे, डॉ. सुनील भारोडकर, डॉ. पूनम वाघ, डॉ. दयाराम पवार, डॉ. संतोष साबळे यांनी कवी कुसुमाग्रज यांच्या कविता वाचल्या. सूत्रसंचालन प्रा. दत्ता पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. सचिन शिंदे यांनी केले.

## कार्यक्रमाचा समारोप

साहित्य, कविता आणि चिंतनाच्या माध्यमातून मराठी भाषेची समृद्धी व अभिमान जपण्याचा संदेश देत हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. उपस्थितांमध्ये कुसुमाग्रजांच्या साहित्याबद्दलची जाण आणि प्रेरणा अधिक वृद्धिंगत झाली.

# "Kusumagraj Jayanti and Marathi Language Day Program Report"

**Date:** 27 February 2025
**Venue:** Academic Auditorium, Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
**Organiser:** Kusumagraj Chair, Yashwantrao Chavan Maharashtra Open University

## Introduction

On the occasion of the birth anniversary of eminent litterateur V. V. Shirwadkar (Kusumagraj) and Marathi Language Day, various cultural and literary programmes are organised every year. Continuing this tradition, the Kusumagraj Chair of Yashwantrao Chavan Maharashtra Open University organised a special programme on 27 February 2025. The programme included recitations of Kusumagraj's poems as well as reflections on his literary works.

## Programme Outline

The programme was presided over by Vice-Chancellor Prof. Sanjeev Sonawane. On the dais were Head of the Kusumagraj Chair, Dr. Dilip Dhondge; Registrar Mr. Dilip Bharad; along with a large gathering of literature enthusiasts, university staff, and officials.

## Main Presentations and Reflections

The programme began with the recitation of selected poems by Kusumagraj. Dr. Dilip Dhondge, while speaking about the literary characteristics of Kusumagraj, highlighted the social awareness, humanistic perspective, and linguistic style in his writings, and also delivered a lecture on Kusumagraj's literature and poetry. Dr. Prakash Barve, Head of the University's Library and Knowledge Resource Centre, shared his memories of time spent with Kusumagraj.

On this occasion, renowned playwright Prof. Datta Patil; director Mr. Sachin Shinde; Mr. Balasaheb Dighe; Dr. Sunil Bharodkar; Dr. Poonam Wagh; Dr. Dayaram Pawar; and Dr. Santosh Sable recited poems by Kusumagraj. The programme was compered by Prof. Datta Patil, and the vote of thanks was proposed by Mr. Sachin Shinde.

## Conclusion of the Programme

Conveying the message of preserving the richness and pride of the Marathi language through literature, poetry, and reflection, the ceremony concluded in an atmosphere of enthusiasm. Among those present, awareness and inspiration regarding Kusumagraj's literature were further strengthened.



**कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त कुसुमाग्रजांच्या फोटोला पुष्पहार अर्पण केला यावेळेस आयोजित केलेल्या विशेष कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या विद्यापीठाच्या स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग तथा प्रा. राम ताकवले संशोधन व विकास केंद्राच्या संचालिका इमिरेट्स प्राध्यापिका डॉ. कविता साळुंके उपस्थित होत्या तसेच समवेत कुसुमाग्रज अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे सर, डॉ. प्रकाश बर्वे सर, डॉ. दयाराम पवार, श्री. सचिन शिंदे, श्री. दत्ता पाटील डॉ. पूनम वाघ, डॉ. संतोष साबळे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.**




**डॉ. सुनील भारोडकर** यांनी कुसुमाग्रज यांची **'पन्नाशीची उमर गाठली'** ही कविता उत्स्फूर्तपणे सादर केली.



**डॉ. बाळासाहेब दिघे** यांनी कुसुमाग्रज यांची **'कधी तुझ्यात्सव'** ही कविता उत्स्फूर्तपणे सादर केली.

लोकमंथन
YCMOU PRO LKMN M6 010325

# मुक्त विद्यापीठात मराठी भाषा दिन साजरा



**लोकमंथन । प्रतिनिधी**

**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनातर्फे कवी कुसुमाग्रज यांची जयंती अभिजात भाषा - मराठी भाषा दिन म्हणून साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीतील सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग तथा प्रा. राम ताकवले संशोधन व विकास केंद्राच्या संचालिका इमिरेट्स प्राध्यापिका डॉ. कविता साळुंके होत्या. यावेळी कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांचे कुसुमाग्रजांचे साहित्य व काव्य यासंबंधी व्याख्यान झाले. विद्यापीठाच्या ज्ञान स्त्रोत केंद्र व भाषा अनुवाद केंद्र प्रमुख डॉ. प्रकाश बर्वे यांनी कुसुमाग्रज यांच्या सोबतच्या आठवणी सांगितल्या. या निमित्ताने प्रसिद्ध नाटककार प्रा. दत्ता पाटील, दिग्दर्शक श्री. सचिन शिंदे, श्री. बाळासाहेब दिघे, डॉ. सुनील भारोडकर, डॉ. पूनम वाघ, डॉ. दयाराम पवार, डॉ. संतोष साबळे यांनी कवी कुसुमाग्रज यांच्या कविता सादर केल्या. सूत्रसंचालन प्रा. दत्ता पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. सचिन शिंदे यांनी केले.

Nashik Edition
Mar 01, 2025 Page No. 6
Powered by: erelego.com

YCMOU PRO SK S4 010325

# मुक्त विद्यापीठात मराठी भाषा दिन

नाशिक, ता. २८ : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात कुसुमाग्रज अध्यासनातर्फे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ ऑनलाइन लर्निंग तथा प्रा. राम ताकवले संशोधन व विकास केंद्राच्या संचालिका इमिरेट्स प्राध्यापिका डॉ. कविता साळुंके होत्या.

कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांचे कुसुमाग्रजांचे साहित्य व काव्य यासंबंधी व्याख्यान झाले. विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केंद्र व भाषा अनुवाद केंद्र प्रमुख डॉ. प्रकाश बर्वे यांनी कुसुमाग्रज यांच्या सोबतच्या आठवणी सांगितल्या. यानिमित्त नाटककार प्रा. दत्ता पाटील, दिग्दर्शक सचिन शिंदे, बाळासाहेब दिघे, डॉ. सुनील भारोडकर, डॉ. पूनम वाघ, डॉ. दयाराम पवार, डॉ. संतोष साबळे यांनी कुसुमाग्रज यांच्या कविता सादर केल्या. सूत्रसंचालन प्रा. दत्ता पाटील यांनी केले.

## कार्यक्रम सदस्य

पुढील सदस्यांनी विवध जबाबदारी सांभाळत हा कार्यक्रम आयोजित केला.

| | | |
|---|---|---|
| **डॉ. दिलीप धोंडगे** | : | **अध्यासन प्रमुख** |
| श्री. दत्ता पाटील | : | समिती सदस्य |
| श्री. सचिन शिंदे | : | समिती सदस्य |
| कु. ऋषिकेश गांगुर्डे | : | मदतनीस |

------------------------------------ **समाप्त** ------------------------------------